# कृषि उत्पन्न बाजार समिती, कोपरगांव

## मुख्य मार्केटयार्ड, कोपरगांव



## आपले सहर्ष स्वागत करीत आहे.

### ✲ जाहीर सुचना ✲

सर्व कांदा उत्पादक शेतकरी बांधवांनाकळिवण्यात येते की, कांदा मार्केटमध्ये आपल्या कांदा विक्रीचे पैंसे रोख (विक्रीच्या दिवशीच) घेण्यात यावे, कोणत्याही कांदा व्यापाऱ्याकडुन पैंशाचा वायदा घेण्यात येऊ नये, जर शेतकऱ्यांनी व्यापाऱ्याकडुन पैंशाचा वायदा घेतल्यास बाजार समिती आपल्या रक्कमेबाबत हस्तक्षेप करणार नाही याची गंभिर नोंद सर्व शेतकरी बंधुनी घ्यावी.

### शेतकरी बांधवांसाठी जाहीर सुचना

सर्व शेतकरी बांधवांना कळविण्यात येते की, कोपरगांव तालुक्यातील परिसरामध्ये काही खाजगी खेडा खरेदी व्यापारी बाजार समितीचा परवाना न घेता अवैधपणे शेतकरी बांधवांच्या घरी जाऊन शेतकऱ्यांच्या शेतमालास जादा भाव देण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींचा फायदा घेऊन आर्द्रता मशिन मध्ये हातचलाखी करुन वाळलेली सोयाबीन, मका, गहु, हरबरा यांची आर्द्रता (ओलावा) जास्त आहे, असे दाखवून प्रतवारी कमी आहे, असे भासवून शेतकऱ्यांची फसवणुक करुन शेतकऱ्यांना कमी भाव देतात तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाचे वजनमाप करतांना इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यात अॅडजस्टमेंट करुन वजनात क्विंटलला २ ते ५ किलोपर्यंत काटामारी करुन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान करतात व पैसे बुडवतात. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना अधिकृत हिशोबपट्टीची प्रत न देता कोऱ्या पावती बुकावर हिशोब देतात. यामुळे शेतकऱ्यांना भविष्यात शासनाकडुन मिळणाऱ्या अनुदानाचा फायदा मिळत नाही अशा बाजार समितीचे बाहेरील व्यवहारास कायदेशिर आधार नसल्यामुळे शेतकरी बांधवांची फसवणुक होते. अशा अनेक तक्रारी शेतकरी वर्गाकडुन बाजार समितीकडे वारंवार येत असतात.

वरील फसवणुक टाळण्यासाठी असे व्यापारी परस्पर शेतमाल खरेदी करतांना आढळुन आल्यास अशा व्यापाऱ्यांची माहिती बाजार समितीला फोन नं.०२४२३-२२२५८८ व मोबाईल नंबर ९८६०७३७८८५/९४२२१०३५१४ वर देऊन सहकार्य करावे जेणेकरुन कोणत्याही शेतकरी बांधवांची फसवणुक होणार नाही.

**बाजार समिती कायदा १९६३ व नियम १९६७ नुसार अशा व्यापाऱ्यांवर कायदेशिर पोलिस कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.**

कोपरगांव बाजार समिती आडत मुक्त असुन येथे उघड लिलावाच्या बोलीने सर्व शेतीमालाचे जाहिर लिलाव होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उंच भाव मिळतो. हमाली व तोलाई वगळता शेतकऱ्याच्या पट्टीत कुठलीही कपात केली जात नाही. याव्यतीरिक्त पैसे मिळण्याची हमी आहे. या करिता शेतकरी बांधवांनी आपला शेतीमाल खाजगी ठिकाणी न विकता कोपरगांव बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्ड कोपरगांव व उपबाजार आवार तिळवणी येथे उघड लिलावात विक्री करुन आपले आर्थिक हित साधावे. हि विनंती.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी व उन्नतीकरिता सतत झटणारी कोपरगांव बाजार समिती आपली बाजार समिती**

### शेतकरी बांधवांसाठी पेमेंट बाबत सुचना

१) सर्व कांदा शेतमाल विक्रीनंतर विक्रीपट्टीची संपुर्ण रक्कम खरेदीदार व्यापारी यांचेकडुन त्याचदिवशी रोख स्वरुपात घेण्यात यावी.

२) सर्व भुसार शेतमाल विक्रीनंतर विक्रीपट्टीची संपुर्ण रक्कम संबंधीत खरेदीदार व्यापारी यांचेकडुन त्याचदिवशी रोख/RTGS ने घेण्यात यावी.

३) रक्कम न मिळाल्यास २४ तासाच्या आत बाजार समितीकडे तक्रार करावी. त्यानंतर केलेल्या तक्रीरीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) शेतकरी बांधवांनी आपला शेतमाल विक्रीस आणतांना सोबत राष्ट्रीयकृत बँक पासबुक स्पष्ठ झेरॉक्स आणावी म्हणजे खात्यावर रक्कम वर्ग करण्यास अडचण येणार नाही.

५) भुसार, कांदा शेतमाल विक्री केल्यानंतर
हमाली -----९.०० पैसे
तोलाई-----६.६० पैसे
एकुण----- १५.६० पैसे
अधिकृत कपात केली जाते. त्यापेक्षा जादा रक्कम कपात केल्यास बाजार समितीकडे तक्रार करावी.

६) बाजार आवारात विक्रीसाठी आणलेल्या शेतमालाचे वजनात कोणत्याही प्रकारची सुट/काटला/कटता अथवा कपात केली जात नाही.

७) कांदा लिलावाचे वेळी वाहनातुन खाली पडलेला कांदा भरणेची मजुरी खालीलप्रमाणे आहे.

**रिक्षा, पिकअप, मिनीडोअर प्रति वाहन ५०/- रुपये**

**ट्रॅक्टर प्रति फाळके ५०/- रुपये.**

यापेक्षा जादा रक्कम कांदे भरणारास देवू नये.

८) लिलावानंतर वांधा पडल्यास शेतकऱ्यांनी परस्पर वांधा न मिटवता बाजार समिती मार्फत वांधे मिटवावे.

✲ आपले नम्र ✲

| नानासाहेब सोपान रनशुर | गोवर्धन बाबासाहेब परजणे | साहेबराव किसनराव रोहोम |
|---|---|---|
| सचिव | उपसभापती | सभापती |

व सर्व सन्मा.संचालक मंडळ, कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, जि.अहिल्यानगर